## ३१ संतांचा महासंत !...

अनंत कोटी ब्रह्मांडांचा, असुनि धनी श्रीमंत !
भक्तीचा भगवंत भुकेला, संतांचा महासंत ! ।।धृ०।।

दु:ख-संकटी मन आक्रंदे !
'आत्म-रुपा' ओळख आनंदे !
सर्वांतरि हरि सुखात नांदे !
रमापती श्रीकांत साह्य दे, का करशी तू खंत ?
भक्तीचा भगवंत भुकेला, संतांचा महासंत ! ।।१।।

देव न केव्हा, प्रपंच-स्वार्थी !
कर्ता-करविता हरि परमार्थी !
नि:संग असुनी दिगंत कीर्ती !
कुरुक्षेत्री हो पार्थ-सारथी, गीतेचा भगवंत !
भक्तीचा भगवंत भुकेला, संतांचा महासंत !।।२।।

महिष-मुखे वदे, 'वेद' सत्वरी !
दळणहि दळतो, जल भरतो घरि !
भक्ताद्वारी पहारा करी !
दरिद्यासही सुदाम्यापरी, दे संपत्ति अनंत !
भक्तीचा भगवंत भुकेला, संतांचा महासंत !।।३।।

महार होई घेउनि काठी !
गाथा तारी, तो जल पृष्ठी !
भक्तासंगे खाई रोटी !
भक्तासाठी भिवरेकाठी, उभा विटी गुणवंत !
भक्तीचा भगवंत भुकेला, संतांचा महासंत !।।४।।

पूर्व-संचितापरी नाचतो !
येतो जो तो, निघूनी जातो !
ठावठिकाणा पत्ता नसतो !
कृपा हरीची होता, होतो जन्म-मृत्युचा अंत !
भक्तीचा भगवंत भुकेला, संतांचा महासंत !।।५।।

विश्व-सूत्र-संचालन तो करि !
विश्व-नाटका गति, 'गिरिधारी !'
कुणी न जाणे, 'कसा श्रीहरी?'
भक्तासाठी नित्य कार्य करि, संतांचा महासंत !
भगवंताला कुणी जाणिले ? मुके धर्म अन् ग्रंथ !।।६।।

००० 